गोदातीर समाचार दि. 25/07/2022

# बनावट चलनी नोटा टोळीतील तब्बल दीड वर्षापासून फरार आरोपीस अटक; हिमायतनगर पोलिसांची कारवाई



**नांदेड**-बनावट चलनी नोटा टोळीतील तब्बल दीड वर्षापासून फरार असलेल्या आरोपीला हिमायतनगर पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे.

या प्रकरणी हिमायतनगर पोलीस ठाण्यात दि. ११ जानेवारी २०२१ रोजी कलम ४२०, ४८९ (ब) (क), ३४ भादवीप्रमाणे दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील आरोपी शेख सत्तार शेख बाबु रा. आंबेडकरनगर बारड, शेख महेमुद शेख रसूल रा. शेखफरीद नगर भोकर, विकास संभाजी कदम रा. टाकराळा ता. हिमायतनगर यांना सदर गुन्ह्यात वेगवेगळ्या तारखेला अटक करुन त्यांच्याकडून तपासामध्ये १०० रुपयाच्या पाच नोटा, २०० रुपयाच्या ४१ नोटा, आणि ५०० रुपयाच्या ४७ नोटा असा एकूण ९३ हजारांच्या बनावट नोटा गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल जप्त करण्यात आल्या होत्या. आरोपीचा एमसीआर करुन सदर गुन्ह्यामध्ये वरील तिन आरोपी व एक फरार आरोपी नामे गजानन बालाजी माने रा. पारवा (बु) ता. हिमायतनगर यांच्या विरोधात विशेष कोर्टात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.

तेव्हा पासुन फरार आरोपी गजानन बाल-ाजी माने रा. पारवा (बु) ता. हिमायतनगर याचा शोध चालू असताना रविवार दि. २४ जुलै नमूद फरार आरोपी हा हिमायतनगर येथे आल्याची गोपनिय माहिती मिळाल्यावरून पोलीस निरीक्षक बी. डी. भुसनुर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. जी. महाजन, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक एन. बी. चौधरी, हवालदार सिंगनवाड, कांगणे, नागरगोजे, जिंकलवाड असे मिळालेल्या माहितीप्रमाणे रवाना होवुन नमुद फरार आरोपी गजानन बालाजी माने रा. पारवा (बु) ता. हिमायतनगर जि. नांदेड यास अटक केली आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अपर पोलीस अधिक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्चना पाटील, पोलीस निरीक्षक बी. डी. भुसनुर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

गोदातीर समाचार दि. 25/07/2022

# ग्राहक बनून आला अन् मोबाईल चोरुन नेला; वजिराबाद पोलिसांनी ३ तासात चोर पकडला



**नांदेड**-सामान्य माणसाने कोर्ट, पो-लीस ठाणे, दवाखान्याची पायरी चढू नये असे वर्षानुवर्षे ज्येष्ठ मंडळी सांगत असतात. परंतु कोणत्या ना कोणत्या कारणाने या तिन्ही घटकांची पायरी चढावी लागल्यावर अनेकांना आलेले अनुभव वेगवेगळे असतात. शहरातील मध्यवस्तीतील एका दुकानात ग्राहक बनून आलेल्या चोरट्याने मालकाचा मोबाईल चोरुन नेला. ही बाब उघड होईपर्यंत वजिराबाद गुन्हे शोध पथकाने चोराला पकडूनच दुकानात आणल्याचा सुखद अनुभव एका व्यापाऱ्याला आला आहे.

शहरातील सुभाष मार्गावर डॉ. लव्हेकर हॉस्पिटल शेजारी न्यू गिरीश फोटो स्टुडिओ आहे. त्याचे मालक गिरीश बाऱ्हाळे असून शुक्रवारी, २१ जुलै रोजी दुपारी ३ ते साडे तीनच्या दरम्यान त्यांच्या दुकानात एक तरुण अर्जंट फोटो काढायचे म्हणून आला. व्यवहाराचे बोलणे होत असताना गिरीश हे संगणकावर आपले काम करु

आलेल्या तरुणाने त्यांचा मोबाईल हातो-हात लंपास केला. आपल्या हातावरचे काम आटोपल्यावर गिरीश यांनी मोबाईल पाहिला तर जागेवर नव्हता. दुकानात व मागे असलेल्या घरीच त्यांनी शोधाशोध सुरु केली. बघता बघता दोन तास झाले. सायंकाळी ६ वाजता तर वजिराबादच्या गुन्हे शोध पथकाच्या पोलिसांनी

खात्री करुन घेतली आणि सुखद धक्का दिला.

गिरीश यांचा चोरलेला मोबाईल तर परत मिळालाच परंतु चोरही पकडल्याने अनेक गुन्हे उघडकीस येण्याची चिन्हे आहेत. ही कामगिरी वजिराबादचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शोध पथकाचे सपोनि निकम, सपोनि संजय नीलपत्रेवार, मनोज परदेशी शरद चावरे, व्यंकटी गंगुलवार,संतोष